# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## जाहिरात (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

ठाणे महानगरपालिकेच्या "मार्कर" या पदाकरीताजाहिरात**१७९ दिवसांसाठी** पात्र व इच्छुक उमेदवारांना प्रसिध्द करण्यात येत आहे. ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईनपध्दतीनेत्यांचे अर्ज दि.०७/०४/२०२१ ते दि.१५/०४/२०२१ रोजीचे रात्री ११.५९ वा.पर्यंत संपूर्णतपशीलासह भरावीत व अर्जात नमूदकेलेली सर्व कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने अपलोड करावे व मुलाखतीच्या वेळेस मुळकागदपत्रांसहसादर करावे.**संकेतस्थळावरई-सुविधा या सदराखाली भरती (Recruitment) येथे क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्जाची लींक उपलब्ध होईल. Link For Applying For the Post OfMarker' या लिंकवर अर्जदाराने क्लिक करावे.**अर्जासोबत नमूदकेलेली मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रेसादरकरणे आवश्यक आहे.मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.तसेच पोस्टाद्वारे अथवा हस्ते प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

| अनु.क्र. | पदनाम | मानधन | एकूण जागा | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १. | मार्कर | रु.१६,९५३/- | २ (दोन) | १. पदवीधर पास असणेआवश्यक<br>२.राष्ट्रीय व राज्यस्तरीयस्पर्धा आयोजनाचा अनुभव<br>३.क्रिडा विभागात प्रत्यक्षकामकेल्याचाकिमान ३ वर्षाचा अनुभव. किंवा कमीतकमी ०३ वर्ष शासकीयकिंवा निमशासकीय क्रिडा स्पर्धांचे आयोजनकेल्याचा अनुभव (ठाणे महापोर चषकस्पर्धा, शालेय क्रिडा स्पर्धा)<br>४.राष्ट्रीय स्पर्धेत किमान ३ वर्ष सहभागी झालेल्या खेळाडूस प्रथम प्राधान्य देण्यात येईल. |

**अर्ज भरण्याबाबतच्या तसेच ऑनलाईन पध्दतीनेसादरकरण्याच्या सुचना:-**

१. www.thanecity.gov.inया संकेत स्थळावर (**ई-सुविधा या सदराखाली (भरती /Recruitment) येथे क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्जाची लींक उपलब्ध होईल. Link For Applying For the Post Marker' या लिंकवर अर्जदाराने क्लिक करावे**.) सदरजाहिरातीद्वारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

२. वयोमर्यादा**:** खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. व मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल असेल.

३. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या पदाच्या उजवीकडे असलेल्या "Apply" या ठिकाणी क्लिक करावे. त्यानंतर भ्रमणध्वनीची वैधता तपासण्यासाठी माहिती भरावी. "send OTP" वर क्लिक केल्यावर अर्जदाराच्या भ्रमणध्वनीवर आलेला OTP क्रमांक नमुद करुन अर्ज भरण्याची पुढील कार्यवाही करावी.

४. अर्जदाराचे भ्रमणध्वनीवर युजर आयडी व पासवर्ड प्राप्त होईल. त्यास जतन करावे.

५. पत्रव्यवहारासाठी स्वत:चा पत्ता लिहावा व्यवसायीक मार्गदर्शनकेंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शनकेंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शककेंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

६. उमेदवाराने आपला वैध ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेचसदर ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक अंतिम निकाल लागेपर्यंतकार्यरत असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई - मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक रजिस्टर्ड (DND) असल्यामुळेसंपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याचीसंपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील, तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनीवर संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींनाठाणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. मुलाखतीबाबतचा संदेश ई-मेल / एस.एम.एस द्वारे कळविण्यात येईल. एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ई-मेल आयडीतयारकरणे आवश्यक आहे.

७. उमेदवाराने अर्ज सादरकरतांना न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम कारवाईसंबंधीची माहिती देणे

८. उमेदवारास ज्या पदाकरीता अर्ज करावयाचा आहे त्या पदांची जाहिरातीमध्ये नमुदकेलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव धारणकरीत असल्याची व अन्य आवश्यककागदपत्रे मुलाखतीच्या दिवशी सादरकरणे आवश्यक आहे.

९. आवश्यकती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यककागदपत्रांची पुर्तताकेल्याशिवाय उमेदवार निवडीस पात्र राहणार नाही. केवळ मुलाखत दिल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताहीहक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेचा अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

१०. उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर सबमिट (Submit) केल्यावर त्यामध्येकोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

११. अर्जात हेतूपुरस्सरखोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणेखाडाखोडकरणे किंवा खाडाखोडकेलेले वा बनावट दाखलेसादरकरणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखेगैरप्रकारकरणा-या उमेदवारांना गुणकमीकरणे, निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षाकरण्याचातसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्यती कारवाई करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही पुर्व सुचनेशिवाय कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

१२. पूर्णत: माहिती भरलेल्या अर्जाचीप्रिंटआऊटकाढून घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाचीप्रिंट मुलाखतीच्या वेळी तसेचकागदपत्रतपासणीच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

१३. संपुर्णपणेकंत्राटी संदर्भातील सर्व माहिती व त्या अनुषंगानेहोणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ www.thanecity.gov.in संकेत स्थळावर उपलब्ध होईल, या व्यतिरिक्तकोणत्याही माध्यमाद्वारे माहिती दिली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. मागवून माहिती मिळाली नाहीतरीही, तक्रारकरता येणार नाही. तक्रारकेल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.

१४. ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भातील संगणीकीय प्रणाली संदर्भात अडी अडचणी असल्यास po@thanecity.gov.in या ई-मेल आयडीवर हरकती घेण्यात येतील अडचणीचे निराकरण करुन ई-मेल आयडीवर संदेश पाठविण्यात येईल उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी अचूकपणे भरणे अनिवार्य आहे.

१५. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारणकेली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचाहक्क प्राप्त झाला असे नाही.

१६. ऑनलाईन अर्ज भरताना शेवटच्या दिवशी एकाच वेळी अनेक ठिकाणाहुन इच्छुक उमेदवार अर्ज भरत राहीलेतर तांत्रिक अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी उमेदवारानी शेवटच्या दिवसाची अंतिम कालावधीची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज सादर करावा. याबाबत उमेदवारास अर्ज सादरकरण्यासाठीकोणतीही वाढीव मुदत देण्यात येणार नाही. तसेच यासंबंधित कोणतीहीतक्रार दाखलकरता येणार नाही. अशा तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**विशेष सूचना :-**

१) अधिकारी/कर्मचारी शारीरीक दृष्टया सक्षम असावा.

२) करार पध्दतीने निवड करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांनी विहीत नमुन्यातील वचनपत्र भरुन देणे आवश्यक आहे.

३) पदभरतीच्या अटीशर्तीमध्ये परिस्थितीनुसार बदल करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना राहिल.

४) महापालिकेससादरकरण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेखे ही महापालिकेच्या अभिलेखाचा भाग होईल.

५) जर एखाद्या उमेदवाराने कंत्राटी भरती कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

६) यापुर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरुन पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे.

७) उमेदवाराने त्याच्या हितासाठीखोटी व चुकीची माहिती / तपशील देऊ नये, खोटी माहिती तथा खोटातपशीलतयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये.

८) करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठीकोणताहीहक्क सांगता येणार नाही.

Sd/-
उपआयुक्त(मुख्यालय)
ठाणे महानगरपालिका,ठाणे

**मा.आयुक्त सो.यांच्या मान्यतेनूसार**

**प्रत :- प्रसिध्दीसाठीठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर**